## मोफत वाळू बंद झाल्याने घरकूलाचे कामे रखडली

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**कोरपना, दि. २७ जून :** अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड, माणिकगढ,सिमेंट उत्पादना सोबतच आपल्या कार्यस्थळी काम करणाऱ्या कामगार व त्यांच्या परिवाराची सर्व बाजूने काळजी घेत असते.त्यासाठी नेहमी नव नविन उपक्रम राबविण्यात येतात. माणिकगढ सिमेंट येथील बु हॉल मध्ये, खान मंत्रालय यांच्या मार्गदर्शना मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. यावेळेस प्रमुख पाहुणे जी राम RCOM, आयबीएम, नागपूर, अतुल कंसल युनिट हेड माणिकगड सिमेंट, एस के तिवारी माइन्स हेड, मुकेश गहलोत वरिष्ठ उपाध्यक्ष उपस्थित होते.

## ब्रम्हपुरी शहरातून अवैध रेती तस्करी

**महासागर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी दि २७ जून :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाद्वारे नुकताच घोषित करण्यात आलेल्या २०२५ च्या पॉलिटेक्निक परीक्षेत महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटेक्निक, बेटाळा येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवत कॉलेजच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे.तृतीय वर्षाच्या स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील कुलक्ष्मी तोंडरे ८४.६८ टक्के घेऊन प्रथम आली तर परीक्षेत विद्युत शाखेतील गौरव मंगर ८४.५६ टक्के घेऊन द्वितीय आला,द्वितीय वर्षातील ज्ञानेश्वर थलाल याने ८९ टक्के घेऊन द्वितीय वर्षात पहिले स्थान पटकावले.

# ग्यारा साल बेमिसाल, मगर विदर्भ की जनता बेहाल

## विदर्भ राज्य आंदोलन समितीचा निषेध

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २७ जून :** नुकतेच नागपूरचे खासदार आणि देशाचे भूतल परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या वतीने त्यांची अकरा वर्षाची मंत्रिपदाची कारकीर्द व केंद्रातील मोदी सरकारची अकरा वर्ष याबाबत गुणगान करणारा सार्वजनिक कार्यक्रम नागपुरात झाला. परंतु दुर्दैवाने म्हणावे लागते की, गेल्या ११ वर्षांत विदर्भातील शेतकऱ्यांच्या कर्जापाई होणाऱ्या आत्महत्यांचे सत्र सातत्याने सुरूच आहे.

कुपोषणामुळे सतत सुरू असलेले गर्भार माता व बालमृत्यू यांचेही प्रमाण कमी झाले नाही. सिंचनाचा अनुशेष भरून निघून १३१ धरणे पूर्ण होऊन १४ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येऊ शकली नाही. खेदाने म्हणावे लागते की, ६९९ कोटीचा जिगाव - टाकळी हा बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यातील तीस वर्षांपूर्वी मंजूर झालेल्या सिंचन प्रकल्पाची किंमत ५० पटीने वाढून ३४ हजार ९२६ कोटी रुपयांवर गेलेली आहे.

त्याची कवडीची खंत केंद्रातील सत्ताधारी पक्षाला आणि विदर्भातील मंत्री व खासदारांना तसेच आमदारांना वाटत नाही.

विदर्भातील नक्षलवादी भाग असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या नाहीत. बल्लारशा - आष्टी - सुरजागड हा रेल्वे मार्ग मंजूर झाला नाही तसेच बडनेरा - कारंजा - मंगरूळपीर - वाशिम हाही रेल्वे मार्ग मंजूर झाला नाही. शिवाय मराठवाडा व विदर्भातील दोन बाजारपेठांना जोडणारा खामगाव - जालना हा रेल्वेमार्गही मंजूर झाला नाही. आष्टी ते सुरजागड हा अत्यंत महत्त्वाचा राज्यमार्ग, त्याचे कॉंक्रीट रस्त्याचे कामही मंजूर झाले नाही. तीन निवडणुका होऊनही विदर्भातील जनप्रतिनिधी वाढले नाही आणि ७० टक्के वीज उत्पादन विदर्भात होऊनही व २६ पैकी २३ खनिजे विदर्भात असूनही २३ पैकी २१ खनिजावर आधारित उद्योग आले नाहीत. ५४ टक्के जंगल विदर्भात असूनही वनांवर व वनउपजावर आधारित उद्योग आले नाहीत अथवा निर्मिती झाली नाही. आज तर राज्य आर्थिकदृष्ट्या दिवाळखोरीत निघाल्यामुळे सिंचनावर व इतर क्षेत्रातील अनुशेषावर केंद्राच्या वतीने भरून काढण्याचा प्रयत्नही झाला नाही.

सन २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी केंद्रात सरकार आल्यास विदर्भाचे राज्य निर्माण करू, असे भाजपाचे तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून विदर्भवाद्यांना लेखी पत्र देऊनही विदर्भाचे राज्य निर्माण करण्यास अपयशी ठरले असून विदर्भातील जनतेचा विश्वासघातच झाला आहे. मुख्य म्हणजे याबद्दल पश्चातापही व्यक्त केला जात नाही, ही दुर्दैवी गोष्ट आहे.

म्हणून केंद्र सरकारच्या या विदर्भ विरोधी भूमिकेचा विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष ॲड. वामनराव चटप, प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व तज्ञ सदस्य डॉ.श्रीनिवास खांदेवाले, देशोन्नतीचे मुख्य संपादक प्रकाश पोहरे, विदर्भ राज्य महिला आघाडीच्या अध्यक्षा रंजना मामर्डे, युवा आघाडीचे अध्यक्ष मुकेश मासुरकर, पूर्व विदर्भ अध्यक्ष अरुण केदार, पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ.पी.आर.राजपूत, पूर्व विदर्भ उपाध्यक्ष सुनिल चोखारे व पश्चिम विदर्भ उपाध्यक्ष ॲड. सुरेश वानखेडे यांनी निषेध केला आहे.

# रोजगार मेळाव्यात २० जणांना नियुक्तीपत्र प्रदान



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २७ जून :** शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर येथे गुरुवारी घेण्यात आलेल्या शिकाऊ उमेदवारी रोजगार भरती मेळाव्यात ७० विद्यार्थ्यांची निवड झाली असून २० जणांना तात्काळ नियुक्तीपत्र देण्यात आले.

कार्यक्रम व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी तसेच प्राचार्य वैभव बोंगीरवार यांच्या मार्गदर्शनात मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषांगिक सूचना केंद्र, चंद्रपूर द्वारा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिकावू उमेदवारी रोजगार भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या भरती मेळाव्याकरिता व्हेरॉक इंजिनिअरिंग, धूत ट्रान्समिशन, पटले प्लेसमेंट सर्विसेस, स्पीक ॲंड स्पेन एज्युकेशन सोल्युशन्स लिमिटेड, ब्रह्मा इंजीनियरिंग ॲंड सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, वैभव एंटरप्राइजेस ॲंड प्लेसमेंट सर्विसेस इत्यादी आस्थापनांनी सहभाग नोंदविला. या रोजगार भरती मेळाव्यात एकूण २६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

यावेळी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मुख्य अधिकारी तथा सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार प्रणाली दहाटे यांनी विद्यार्थ्यांना अप्रेंटिसशिप करण्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच मेळाव्याद्वारे मिळालेल्या संधीचा लाभ घेऊन यशस्वी होण्याचे आवाहन केले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शिकाऊ उमेदवार रोजगार भरती मेळाव्याकरिता अप्रेंटिसशिप सेल तथा राईट वॉक फाउंडेशन चंद्रपूर व गडचिरोली विभागाचे समन्वयक कपिल बांबोडे यांनी अप्रेंटिसशिप, त्याचे फायदे, निवड प्रक्रिया आणि सॉफ्ट स्किल याची माहिती दिली.

कार्यक्रमाचे संचालन योगेश धवणे यांनी केले. यावेळी कंपनी कोऑर्डीनेटर म्हणून विजय तांदळे, मनोज पाटील, खोब्रागडे तसेच इतर समन्वयक, बीटीआरआयच्या श्रीमती लोखंडे, श्री. महातो तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे गटनदेशक श्री. नंदेश्वर, निमसरकार, चांदेकर व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## स्टेट बँक ऑफ इंडिया बल्लारपूरच्या वतीने रक्तदान शिबिर



**महासागर प्रतिनिधी**

**बल्लारपूर, दि. २७ जून :** स्टेट बँक ऑफ इंडिया बल्लारपूरच्या वतीने बँकेच्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त शाखेमध्ये कर्मचारी व ग्राहकांच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बल्लारपूर शाखेच्या वतीने सुद्धा रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. शाखाप्रमुख मंगेश कापेकर व सर्व कर्मचारी व ग्राहकांनी रक्तदान केले. याप्रसंगी ब्लड बँक च्या वतीने तसेच शाखा बल्लारपूर सर्व रक्तदात्यांना भेटवस्तू प्रमाणपत्र व एनर्जी ड्रिंक देण्यात आले. बँकेच्या वतीने रक्तदात्यांचे धन्यवाद करण्यात आले

## शेतकऱ्याकडून वीज कार्यालयाला घेराव

### तालुका कॉंग्रेस अध्यक्ष विजय गावंडे यांचा पुढाकार



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. २७ जून :** महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ शंकरपूर कार्यालय अंतर्गत मागील एक महिन्यापासून शेतीपंपाची विज नसल्यामुळे शेतकऱ्याकडून शंकरपूर येथील वीज कार्यालयाला आज शुक्रवारी घेराव घालण्यात आला.

एक महिन्यापूर्वी वादळी वारा व पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पोल व तार तुटलेल्या आहे. त्यामुळे शेतकऱ्याची शेती पंपाची वीज बंद पडलेली होती. शेतकरी वारंवार वीज कार्यालयात जाऊन शेतीपंपाची वीज सुरू करण्यासाठी भेटत होते परंतु त्या शेतकऱ्यांना कोणताही दिलासा मिळत नव्हता सध्या शेतकऱ्यांनी मृगाचा पाऊस पडल्यामुळे कापूस , सोयाबीन, धान व अन्य पिकाची पेरणी केली आहे आणि आद्रा नक्षत्रात पाऊस न आल्यामुळे पेरलेले शेत बियाणे मरणाच्या अवस्थेत आहे असे असताना मागील एक महिन्यापासून वीज कार्यालयाने शेतातील तुटलेल्या तार व पोल दुरुस्त केलेले नाही. ही समस्या शेतकऱ्यांनी तालुका कॉंग्रेस कामिटीचे अध्यक्ष विजय गावंडे यांच्याशी संपर्क साधला त्यांनी कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोन करून याची माहिती दिली परंतु माहिती दिल्यानंतरही दोन दिवसापासून वीज सुरु न झाल्यामुळे अखेर शुक्रवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास शेकडो शेतकऱ्यांना घेऊन वीज कार्यालय येथे धडक दिली व कार्यकारी अभियंता जळगावकर यांना घेराव घातला याप्रसंगी शेतकऱ्यांना संबोधन करण्यात आले अखेर चिमूर येथील कार्यकारी अभियंता जळगावकर यांनी शेतकऱ्यांच्या वतीने निवेदन स्वीकारले असून एका दिवसात शेतीपंपाची वीज सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आले त्यानंतर हा मोर्चा थांबविण्यात आला आहे. या आंदोलनात रवींद्र गावंडे दिवाकर पांगुळ, प्रणय ठाकरे, लव भोयर, बळी गावंडे ,जोगेंद्र कडू, गारगाटे धोटे ,वामन महाले, पिंटू महाले , संजय बोबडे , मनोज लेदाडे, तसेच साठगाव, हिवरा, कोलारी ,आजगाव पाचगाव, पांजरेपार, खैरी व परिसरातील शेतकरी उपस्थित होते. भिसी पोलिस ठाण्याचे ठाणेदार घोंगडे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# प्रदूषण नियंत्रणासाठी मोहीम राबविण्याचे आयुक्तांचे निर्देश

## राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत आढावा बैठक



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २७ जून :** प्रदूषण मुक्तीसाठी शासनातर्फे विविध उपाययोजना केल्या जात असल्या तरी प्रत्येकाचा या मोहिमेत सहभाग असणे आवश्यक आहे. चंद्रपूर शहरातील हवा प्रदूषणाची पातळी निर्धारित मानकापेक्षा अधिक व धोकादायक असल्याने सर्व शासकीय विभागांनी प्रदूषण नियंत्रणासाठी मोहीम राबविण्याचे निर्देश राष्ट्रीय शुद्ध हवा समिती चंद्रपूरचे अध्यक्ष आयुक्त विपीन पालीवाल यांनी राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत दिले.

आपल्या शहरात वाहनांचे आणि कारखान्यांचे प्रदूषण तर मोठ्या प्रमाणात आहेच मात्र रबरी टायर, पाला पाचोळा व इतर कचरा जाळल्याने मोठ्या प्रमाणात धुर होऊन कार्बन हवेत पसरतो. सकाळ संध्याकाळी कोळसा जाळल्यास त्याचा धुर हा आपल्या श्वास घेण्याच्या पातळीवर असतो आणि तेव्हा तो धोकादायक असतो. शहरातील सर्व वाहने हे पीयुसी प्रमाणित असणे आवश्यक आहे यासाठी आरटीओ कार्यालयाद्वारे पुढील काही दिवस मोहीम राबविण्याचे निर्देशही त्यांनी याप्रसंगी दिले.

नव्या पिढीला शुद्ध हवा, शुद्ध पाणी, स्वच्छ रस्ते देणे ही आपली जबाबदारी आहे. आपल्या शहरात, समाजात, कुटुंबात याविषयी जागृती झाली पाहिजे. सांडपाणी, कचरा यांची योग्यरित्या विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. मनपा स्वच्छता निरीक्षकांनी कचरा जाळल्या जाऊ नये याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

याप्रसंगी वायू गुणवत्ता व्यवस्थापन योजना, आरोग्य क्षेत्र नियोजन, परिवहन क्षेत्र नियोजन, औद्योगिक क्षेत्र नियोजन, ध्वनी प्रदूषण क्षेत्र नियोजन, शहरातील प्रदूषण नियंत्रण, भविष्यातील कृती आराखडा या विषयांच्या अनुषंगाने उपस्थीत अधिकाऱ्यांनी आपले विचार मांडले.

सदर बैठकीस डॉ. प्रभा राव शास्त्रज्ञ, निरी,अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी,सिव्हिल सर्जन,जिल्हा पुरवठा अधिकारी, कार्यकारी अभियंता पीडब्लुडी, [illegible] महाव्यवस्थापक,महाव्यवस्थापक फेरो अलॉय,महाव्यवस्थापक (पर्यावरण) डब्ल्यूसीएल,उप प्रादेशिक अधिकारी आरटीओ,उप पोलीस निरीक्षक (वाहतूक), शहर अभियंता रवींद्र हजारे, डॉ. अमोल शेळके, सुरेश चोपणे,गोपाळ मुंधडा,इको प्रो अध्यक्ष उपस्थित होते.

# कॉंग्रेसच्या माजी महिला जिल्हा अध्यक्षा नंदा अल्लुरवार यांचा भाजपमध्ये प्रवेश



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २७ जून :** कॉंग्रेसच्या माजी महिला जिल्हा अध्यक्षा नंदा अल्लुरवार यांनी भारतीय जनता पक्षात अधिकृत प्रवेश केला. आमदार किशोर जोरगेवार यांच्या विवेक नगर येथील गजानन निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात आमदार किशोर जोरगेवार, आमदार किर्तिकुमार (बंटी) भांगडीया यांच्या उपस्थितीत नंदा अल्लुरवार यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

यावेळी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार यांनी अल्लुरवार यांच्या गळयात भारतीय जनता पक्षाच्या दुपट्टा टाकून त्यांचा प्रवेश करवून घेतला.

नंदा अल्लुरवार या माजी मंत्री स्व. वामनराव गड्डमवार यांची कन्या असून त्यांच्या घराण्याचा जिल्ह्यातील राजकारणात ठसा आहे. त्या तीस वर्षांहून अधिक काळ चंद्रपूर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक राहिल्या असून सहकार क्षेत्रात, महिला विकासात आणि सामाजिक कार्यात त्यांचे मोठे योगदान आहे. शहर कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावर कार्यरत असताना त्यांनी संघटना मजबूत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले होते.

भाजपमध्ये प्रवेश करताना नंदा अल्लुरवार म्हणाल्या, 'आज मी भारतीय जनता पक्षात प्रवेश करताना मला समाधान वाटते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नेतृत्व, विकासाचा दृष्टिकोन, सामान्य माणसासाठी चालवलेले विविध उपक्रम, महिला सक्षमीकरणाचे धोरण मला भावते. चंद्रपूर जिल्ह्यात आमदार किशोर जोरगेवार आणि आमदार किर्तिकुमार भांगडीया यांनी विकासाचे काम केले आहे. मला त्यांच्या सोबत काम करून लोकांसाठी अधिक चांगले योगदान देता येईल असा विश्वास व्यक्त केला. या प्रवेशामुळे राजकीय समीकरणात बदल होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. नंदा अल्लुरवार यांचा कॉंग्रेसमध्ये दीर्घकाळाचा अनुभव, त्यांचा सहकार क्षेत्रातील दबदबा, महिलांमध्ये असलेली लोकप्रियता भाजपच्या संघटनाला अधिक बळकटी देईल, असे मानले जात आहे.या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले, नंदा अल्लुरवार या अनुभवी, कणखर नेतृत्वाच्या आणि सामाजिक कामात रुजलेल्या कार्यकर्त्या आहेत. त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी, सहकार चळवळीसाठी केलेले योगदान मोठे आहे. त्यांच्या भाजप प्रवेशामुळे पक्षाला ताकद मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आमदार किर्तिकुमार (बंटी) भांगडीया म्हणाले, भाजपमध्ये नंदा अल्लुरवार या प्रवेश करून आपल्या कुटुंबात सामील झाल्या आहेत. त्यांनी दीर्घकाळ सहकार क्षेत्रात लोकांशी जवळचा संपर्क ठेवला आहे. त्यांचा अनुभव, लोकांशी असलेली जवळीक पक्ष संघटनेसाठी आणि विकासासाठी मोलाची ठरेल. चंद्रपूर जिल्ह्यात भाजपची ताकद वाढवण्यासाठी आपण सर्वजण एकत्रितपणे प्रयत्न करू,' असे ते म्हणाले.

नंदा अल्लुरवार यांच्या भाजप प्रवेशामुळे चंद्रपूरातील राजकारणात नवीन घडामोडींना चालना मिळेल, असे मानले जाते. कॉंग्रेसच्या जुन्या नेतृत्वातील मोठे नाव भाजपमध्ये सामील झाल्याने भाजपच्या स्थानिक पातळीवरील रणनीतीला मजबुती मिळेल आणि येत्या काळातील स्थानिक निवडणुकांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो, असेही मानले जाते.

# ब्रम्हपुरीत भरपावसात कॉंग्रेसच्या वतीने विराट मोर्चा

## शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणाऱ्या महायुती सरकारला पावसाळी अधिवेशनात धारेवर धरणार : विधीमंडळ कॉंग्रेस पक्षनेते आ.विजय वडेट्टीवार




**महासागर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २७ जून :** राज्यातील सरकारकडे शक्तीपीठ मार्ग बांधण्यासाठी दीड लाख कोटी रुपये आहेत. मात्र शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी पैसे नाहीत, उद्योगपतींचे १९ लाख कोटी रुपये कर्ज या महायुती सरकारने माफ केले पण शेतकऱ्यांचे कर्जमाफ करण्याची वेळ आली तर त्यासाठी आधी समीती नेमण्याची भाषा हे सरकार करीत आहे. सत्तेसाठी कर्जमाफीचे खोटे आश्वासन देणाऱ्या या सरकारला पावसाळी अधिवेशनात धारेवर धरून शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असे प्रतिपादन विधीमंडळ कॉंग्रेस पक्षनेते तथा आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले.

शेतकरी, शेतमजूर, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थी यांच्या हितासाठी झोपलेल्या युती सरकारला जाग आणण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेचे माजी विरोधी पक्षनेते, विधीमंडळ कॉंग्रेस पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली तहसिल कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी मोर्चेकऱ्यांना संबोधित करतांना ते बोलत होते.

या मोर्चात ब्रम्हपुरी तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर, संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थी व कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते हजारोच्या संख्येने सहभागी झाले होते. सदर मोर्चाला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातून सुरुवात होवून तहसील कार्यालय ब्रम्हपुरी येथे समाप्ती झाली. मोर्चा दरम्यान पावसाने हजेरी लावली होती. तरी देखील भरपावसात भिजून मोर्चेकरी मोर्चात सहभागी झाले होते हे मात्र विशेष.

सदर मोर्चा मध्ये शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करण्यात यावी. संपूर्ण शेतकऱ्यांची बोनसची रक्कम ८ दिवसाच्या आत जमा करण्यात यावी. संजयगांधी निराधार तसेच श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांचे गेल्या ६ महिण्यांपासून थकित असलेले मानधन तात्काळ देण्यात यावे. सामुहिक वन हक्क समिती मध्ये होत असलेल्या गैर प्रकारची चौकशी करुन राधा ऑर्गनायजेशनवर कारवाई करण्यात यावी. अनुसुचीत जाती जमाती च्या विकासा करीता तरतूद करण्यात आलेला निधी इतरत्र वळवू नये व तो अनुसूचित जाती जमातीच्या उन्नती साठी खर्ची करण्यात यावा व बंद करण्यात आलेला पोर्टल त्वरित सुरु करण्यात यावा. सौर उर्जेच्या ऐवजी पारंपारिक विज जोडण्यात यावी व शेतकऱ्यांना त्वरित न्याय द्यावा या मागण्या करण्यात आल्या.

सदर मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्या मार्फतीने मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले.

## देशी दारुची अवैध वाहतुक करणारे इसमास अटक

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २७ जून :** पोलीस स्टेशन पाथरी अंतर्गत मौजा मेहा (बुज) गोसी खुर्द नहराजवळील रोडवर नाकाबंदी करून चारचाकी वाहन मारोती कार क्र. एम.एच.२९-जे-०४४८ यास थांबवुन पंचासमक्ष सदर वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनात ठेवलेली देशी दारु च्या ९० एम.एल. च्या एकुण २००० नग बॉटल २० बॉक्स मध्ये असल्याचे दिसुन आल्याने सदर मारोती कार किं. ८०,००० रु आणि अवैध दारु किं. ७०,००० असा एकुण १,५०,०००रुपयाचा माल मिळुन आले.

## वार्षिक साधारण सभेचे नोटीस

भद्रावती विकास खंड औद्योगिक बहुउद्देशीय ग्रामीण कारागीर सहकारी संस्था मर्या. भद्रावती, र.नं. ३७४ चे सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की संस्थेची वार्षिक साधारण सभा दिनांक २०/०६/२०२५ रोज रविवारला दुपारी ठीक १.०० वाजता संस्थेचे कार्यालयात घेण्याचे आयोजित केलेली आहे. तरी सभेला उपस्थित राहावे ही विनंती.

वार्षिक साधारण सभेचा ज्या सभासदांना नोटीस मिळाला नसेल त्यांनी हीच सभेची नोटीस असे समजावे.

**के.के.पावडे**
**अध्यक्ष**

**पी.एन.पावडे**
**सचिव**

## दक्षिण पूर्व मध्य रेल्वे

### ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग सुविधेच्या विविध कामांसाठी व अपग्रेडेशनसाठी ई-निविदा सूचना

**1. निविदा सूचना:** EL-G-E-OT-25-26-08
दिनांक: 18.06.2025
**कार्य:** नागपूर मंडळातील केळझर (KEZ) चे गुड्स शेडचे अपग्रेडेशन / आधुनिकीकरण.
**निविदा मूल्य:** ₹ 37,56,246/-,
**बिड सेक्युरिटी:** ₹ 75,100/-

**2. निविदा सूचना:** EL-G-E-OT-25-26-09
दिनांक: 18.06.2025
**कार्य:** विद्युत कार्यांसाठी: **(A)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**मुढ़ीपार**). **(B)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**सालेकसा**). **(C)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**आमगांव**). **(D)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**छिंदवाड़ा**). **(E)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**तिरोड़ा**). **(F)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**भंडारा**). **(G)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**चाचेर**). **(H)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**घंसौर**). **(I)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**नैनपुर**). **(J)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**चौराई**). **(K)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद. (**भोमा**). **(L)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**पलारी**). **(M)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**केळझर**). **(N)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**बालाघाट**). । **(O)** ट्रॅक मशीन साठी साइडिंग सुविधा आणि ट्रॅक मशीन स्टेबलिंग साइडिंग मध्ये अपेक्षित पायाभूत सुविधांची तरतूद (**चारेगांव**).
**निविदा मूल्य:** ₹ 2,07,08,635/-,
**बिड सेक्युरिटी:** ₹ 2,53,600/-
**निविदा प्रस्तुति तिथि:** दिनांक **04.07.2025** ते **18.07.2025** च्या **15:00** वाजेपर्यंत.
**निविदा उघड़ने:** दिनांक **18.07.2025** ला.

अधिक तपशिलांसाठी वरिष्ठ डीईई (RS& G), नागपूरच्या कार्यालयाशी संपर्क साधा किंवा वेबसाइट **www.ireps.gov.in** वर उपलब्ध निविदा दस्तऐवज पहा/डाउनलोड करा.

**वरिष्ठ मंडळ विद्युत अभियंता (RS&G),**
**दक्षिण पूर्व मध्य रेल्वे,**
**नागपूर**

MS/11-50

स्वच्छ भारत अभियान
एक कदम स्वच्छता की ओर

## चंद्रपूर गरीमा शाखेतर्फे वेंडिग मशीन

महासागर प्रतिनिधी

**घुग्घुस, दि. २७ जून :** येथील भाजपा व पतंजली योग समिती द्वारा २१ जुन रोजी सकाळी प्रयास सभागृहात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साजरा होणारा ११ वा जागतिक योगदिन भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांच्या नेतृत्वात उत्साहात साजरा करण्यात आला.याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचे हस्ते दीप प्रज्ज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. मनोगत व्यक्त करतांना भाजपाचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे म्हणाले, योगाला आपल्या दैनंदिन जीवनशैलीचा भाग बनवा.

## शाळेच्या पहिल्या दिवशी मिळाले मुलांना पुस्तक

महासागर तालुका प्रतिनिधी


**भद्रावती, दि. २७ जून :** शहरातील शिवाजी नगर येथील ५२२ बटे ८ मधील ५२ प्लाटधारकांना ५७ वर्षांचा कालावधी उलटूनही अद्याप प्लाटचा अधिकृत मालकीहक्क मिळालेला नाही. याविषयी अनेकदा निवेदने देऊन व परस्पर संबंधीत अधिकाऱ्यांना भेटुनही अद्याप त्यांना न्याय मिळालेला नाही. विशेष म्हणजे याच नगरातील एका भुखंडांना शासनातर्फे अ वर्ग आखीव पत्रीका मिळालेल्या आहेत मात्र आम्हाला अशा आखीव पत्रीका किंवा सातबारा का मिळालेला नाही हा प्रश्न येथील प्लाटधारकांनी उपस्थीत केला आहे.आम्हा सर्वांना प्लाटचे अ वर्ग आखीव पत्रीका किंवा सातबारा देण्यात यावा अशी मागणी केली आहे.

# मनपातील भ्रष्ट अधिकाऱ्याला पदोन्नती...

### आयुक्तासह प्रधान सचिवां विरूद्ध फौजदारी याचिका टाकणार. माजी नगरसेवक पप्पू देशमुख यांचा लेखी इशारा

महासागर प्रतिनिधी

**चंद्रपूर, दि. २७ जून :** २३४ कोटी रूपयांची अमृत-१ व २७० कोटी रूपयांची अमृत-२ पाणीपुरवठा योजना, ५०६ कोटी रूपयांची अमृत मलनिस्सारण योजना तसेच शहरात विविध ठिकाणी फाउंटेन लावणे, रामाळा तलाव पुनर्जीवन व सौंदर्यीकरण, १०० कोटी रूपयांचे कचरा संकलन व वाहतुकीचे काम, मालमत्ता कर मुल्यांकन प्रसिद्धीचे कंत्राट, कोरोना काळात भोजन पुरविणे, मालमत्तेचे फेर मुल्यांकन अशा कोट्यावधी रुपयांच्या विविध कामांमध्ये गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याची लेखी तक्रार मनपाचे माजी नगरसेवक व जनविकास सेनेचे संस्थापक अध्यक्ष पप्पू देशमुख यांनी



नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव यांना केली होती. विविध कामातील घोटाळ्यांची एसआयटी मार्फत चौकशी करण्याच्या मागणीसाठी दिनांक १२ जुलै २०२४ रोजी देशमुख यांनी मंत्रालयातील नगर विकास विभागाच्या प्रधान सचिव कार्यालयात पत्र दिले. मात्र मनपातील घोटाळ्यांची चौकशी करण्याऐवजी नगर विकास विभागाने मनपाचे भ्रष्ट आयुक्त विपिन पालीवाल यांना पदोन्नती दिली.

या प्रकारामुळे संतप्त झालेल्या देशमुख यांनी दिनांक २४ जून २०२५ ला प्रधान सचिवांना पत्र देऊन न्यायालयात फौजदारी याचिका टाकण्याचा इशारा दिला. एवढेच नव्हे तर फौजदारी याचिकेमध्ये थेट प्रधान सचिवांना गैरअर्जदार करण्यात लेखी इशारा सुद्धा त्यांनी दिला.

चंद्रपूर महानगरपालिकेत आतापर्यंत झालेल्या सर्व घोटाळ्यांना तसेच भ्रष्ट आयुक्त विपिन पालीवाल यांना मंत्रालयातील नगर विकास विभागाचे संरक्षण असल्याचा आरोप देशमुख यांनी केला.भ्रष्ट आयुक्त पालीवाल यांना पदोन्नतीचे बक्षीस देणाऱ्या नगर विकास विभागातील अधिकाऱ्यांविरुद्ध मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे देशमुख यांनी लेखी तक्रार केली.

### आमदार सुधाकर अडबाले 'हक्कभंग' प्रस्ताव मांडणार

माजी नगरसेवक पप्पू देशमुख यांनी मनपातील भ्रष्टाचाराबाबत नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांना पत्र दिले होते. आमदार अडबाले यांनी १२ जुलै २०२४ रोजी नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र देऊन मनपातील सर्व घोटाळ्यांची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी केली होती. मात्र आजपावेतो प्रधान सचिव कार्यालयाने या प्रकरणाबाबत आमदार अडबाले यांना कोणतीही माहिती पुरविली नाही.त्यामुळे येत्या पावसाळी अधिवेशनात विधान परिषदेत हक्कभंग प्रस्ताव मांडणार व चंद्रपूर मनपा तसेच नगर विकास विभागाच्या सर्व भ्रष्ट अधिकारी यांच्या विरुद्ध कारवाई करण्याकरिता पाठपुरावा करणार असे आश्वासन आमदार अडबाले यांनी माजी नगरसेवक देशमुख यांच्याशी चर्चा करतांना दिले.

# खासदार प्रतिभा धानोरकर यांच्याकडून अपघातग्रस्त महिलेला तातडीची मदत

महासागर प्रतिनिधी

**चंद्रपूर, दि. २७ जून :** चंद्रपूर येथील रेल्वे क्रॉसिंगजवळ काही दिवसांपूर्वी झालेल्या एका भीषण अपघातात रामकला रामचंद्र सिडाम रा. मुधोली ता. भद्रावती ही महिला गंभीर जखमी झाली. या अपघातात तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, मेंदूत रक्तस्राव झाल्याने तिची प्रकृती चिंताजनक बनली आहे. ही माहिती मिळताच खासदार प्रतिभा धानोरकर यांनी तात्काळ रामकलाला मदतीचा हात पुढे केला. त्यांच्या माध्यमातून सुयोग भोयर यांनी तिच्या मुलगा धर्माला आर्थिक मदत दिली आहे.



अपघातग्रस्त रामकला यांचा मुलगा धर्मा याची कौटुंबिक आणि आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. तो सध्या चंद्रपूर येथे बिएच्या द्वितीय वर्षाचा विद्यार्थी आहे आणि शासकीय वसतिगृह क्रमांक २ मध्ये राहून शिक्षण घेत आहे. त्याच्या कुटुंबाकडे कोणतीही स्थावर मालमत्ता नाही. २०१७ मध्ये धर्माचे वडील वारले असून, रामकला स्वतः मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होत्या. एकीकडे स्वतःचे शिक्षण आणि दुसरीकडे आपल्या आईच्या उपचाराची आणि कुटुंबाची जबाबदारी, अशा दुहेरी परिस्थितीत धर्मा संघर्ष करत असतानाच हा दुर्दैवी अपघात घडला आहे.

सध्या रामकलावर दीक्षित हॉस्पिटल, चंद्रपूर येथे उपचार सुरू आहेत. तिच्या उपचारासाठी मोठ्या आर्थिक मदतीची आवश्यकता असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. खासदार प्रतिभा धानोरकर यांनी तातडीने मदत करून माणुसकीचा आदर्श घालून दिला आहे.

## चक्री व्याजाच्या स्वरूपाने संपूर्ण घुग्घुस शहरतील सामान्य जनतेची महावितरण मार्फत लूट

### शिवसेना (उबाठा गट) यांचे निवेदन



महासागर प्रतिनिधी

**घुग्घुस, २७ जून :** घुग्घुस येथील महावितरण कार्यालयात शिवसेवा (उबाठा), घुग्घुस यांच्या वतीने नागरिकांच्या समस्या मांडत वीज बिलातील व्याज कमी करण्याची आणि मीटर रीडिंगचा फोटो थेट वीजबिलावर छापण्याची मागणी करत निवेदन सादर करण्यात आलं.

निवेदनात नमूद करण्यात आलं की, अनेक नागरिक वेळेवर वीज बिल भरत असतानाही त्यांच्या बिलांमध्ये चक्री व्याजाचा समावेश केला जात आहे, ज्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. तसेच, मीटर रीडिंग चुकीचं घेतल्यामुळे अनेकदा बिल चुकीचं येतं. त्यामुळे पारदर्शकता राखण्यासाठी आणि ग्राहकांचा विश्वास वाढवण्यासाठी मीटर रीडिंग घेतल्याचा फोटो वीज बिलावर छापणं गरजेचं आहे.

यावेळी बोलताना अमित बोरकर यांनी सांगितलं की, सर्वसामान्य नागरिकांवरील आर्थिक ताण लक्षात घेता वीज बिलातील व्याज कमी करणं आवश्यक आहे.

मीटर रीडिंगचा फोटो छापल्यास गैरसमज टाळता येतील आणि महावितरण व ग्राहक यांच्यात विश्वास वाढेल. त्यांनी यासोबतच रात्रभर होणाऱ्या वीज खंडनाचाही मुद्दा उपस्थित करत, लहान मुलांना होणाऱ्या त्रासाचा विचार करून तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली.

हे निवेदन कनिष्ठ अभियंता, महावितरण कार्यालय, घुग्घुस यांच्याकडे कारवाईसाठी सादर करण्यात आलं असून, याची प्रत कलेक्टर, चंद्रपूर; वरिष्ठ अभियंता, महावितरण कार्यालय,चंद्रपूर आणि ब्रीथ ऑफ लाईफ मल्टीपरपज सोसायटीचे अध्यक्ष व संस्थापक यांना देखील पाठवण्यात आली आहे.

यावेळी शिवसेना (उबाठा) शहर अध्यक्ष चेतन (बंटी)घोरपडे,माजी ग्रामपंचायत सदस्य गणेश उईके, अमित बोरकर,प्रणयकुमार बंडी आदी मान्यवर उपस्थित होते.

# ब्रम्हपुरी नगर परिषदवर चिखलफेक आंदोलनाचा इशारा : प्रा. सुयोग बाळबुधे

महासागर तालुका प्रतिनिधी

**ब्रम्हपुरी, दि. २७ जून :** ब्रम्हपुरी शहरातील भूमिगत गटार लाईनच्या अर्धवट व अनियोजित कामांमुळे संपूर्ण शहरातील रस्त्यांची अक्षरशः चिखलदरी झाली असून, नागरिकांना दररोज मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्याच्या तोंडावर रस्त्यांची झालेली दुर्दशा, अपुऱ्या सुविधा व जलमय मार्गांमुळे नागरिकांचे आरोग्य व दैनंदिन जीवन धोक्यात आले आहे.



या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचे ब्रम्हपुरी शहर अध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे यांनी तीव्र शब्दात नगरपरिषद प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर तात्काळ ही परिस्थिती सुधारली नाही व नागरिकांच्या समस्याकडे गांभीर्याने लक्ष दिलं गेलं नाही, तर भारतीय जनता पक्षातर्फे नगरपरिषद ब्रम्हपुरीवर 'चिखलफेक आंदोलन' छेडण्यात येईल.प्रशासनाने नागरिकांच्या सहनशीलतेची परीक्षा घेऊ नये. ब्रम्हपुरी शहराच्या स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्याची जबाबदारी ही केवळ निवडणुकीपुरती मर्यादित न ठेवता, ती सातत्याने योग्य नियोजनाने पार पाडली पाहिजे, अशी जोरदार मागणी प्रा. बाळबुधे यांनी यावेळी केली.निवेदन देताना भाजप शहर अध्यक्ष इंजि अरविंद नंदुरकर,महामंत्री मनोज भूपाल,तालुका महामंत्री मनोज वठे,जिल्हा युवा महामंत्री तनय देशकर,युवा शहर महामंत्री स्वप्नील अलगदेवे,महिला प्रदेश सचिव रश्मी खानोरकर, प्रा.अशोक सालोटकर, पवन जयस्वाल, राजूजी भागवत,रेहमान पठाण,अमित रोकडे,बंटीभाऊ येरावार, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## भद्रावतीचे विजय गेडाम राज्यपालांच्या हस्ते राष्ट्रपती पोलिस पदकाने मुंबई येथे सन्मानित



महासागर तालुका प्रतिनिधी

**भद्रावती, दि. २७ जून :** पोलिस दलात कार्यरत असताना उत्कृष्ट कामगिरी करणारे पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांना शासनाकडून सन्मानित करण्यात आले आहे. भद्रावतीच्या लोकमान्य विद्यालयात दहावी पर्यंतचे शिक्षण घेतलेल्या विजय गेडाम यांना मुंबई येथे गुरुवार दि.२६ जूनला पार पडलेल्या एका शासकीय समारोहात महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राष्ट्रपती पोलिस पदक प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे.विजय गेडाम हे सध्या चंद्रपूर येथील रामनगर पोलिस स्टेशन येथे पोलिस उपनिरीक्षक पदावर कार्यरत आहेत. याच्यासह महाराष्ट्र राज्यातील एकूण ८३ अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांना. राष्ट्रपती शौर्यपदक, राष्ट्रपती पोलीस पदक व उत्कृष्ट सेवेबद्दल पदक बहाल करण्यात आले. यात गडचिरोली येथील राष्ट्रपती शौर्य पदक ४१, राष्ट्रपती पोलीस पदक ०३ आणि उत्कृष्ट सेवेबद्दल ३९ असे एकूण ८३ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील मरेगाव नवरगावातील उद्धव गेडाम यांचे ते सुपुत्र असून वडिलांना भद्रावतीच्या दारूगोळा कारखान्यात नोकरी लागल्यानंतर ते येथे स्थायी झाले.विजय यांनी पहिली ते चौथी पर्यंत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शिक्षण घेतले नंतरचे दहावीपर्यंतचे शिक्षण भद्रावतीच्या लोकमान्य विद्यालयात घेतले.त्यानंतर सन १९८९ मध्ये ते पोलिस विभागात कमांडो या पदावर रूजू झाले. त्यानंतर त्यांनी नक्षलसेलमध्ये ७ वर्षे कामे केली. या ७ वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक चांगली कामे केली. याच कामाची दखल घेऊन त्यांना सन २०२२ मध्ये राष्ट्रपती पोलिस पदक जाहीर करण्यात आले आहे. नक्षलसेलमध्ये ७ वर्षे काम केल्यानंतर त्यांनी राजुरा पोलिस ठाण्यात ६ वर्षे काम केले. सावली तालुक्यातील पाथरी पोलिस चौकीतही त्यांनी काही वर्षे काम केले. त्यानंतर परत ६ वर्षे नक्षलसेलमध्ये ते कार्यरत होते, महामार्ग पोलिस विभागात सहायक पोलिस उपनिरीक्षक या पदावर काम केले.आता ते चंद्रपूरच्या रामनगर पोलीस स्टेशन येथे पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत आहे.सोबतच त्यांना व इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मुंबई येथे पोलीस विभागाच्या एका समारोहात महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी देखील सन्मानित केले.

# लागवडीच्या हंगामाची यशस्वी सुरुवात करण्यासाठी उच्च दर्जाचे बियाणे वापरणे अत्यंत महत्त्वाचे

महासागर प्रतिनिधी

**नेरी, दि. २७ जून :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कार्यरत कृषी महाविद्यालय, मुल-मरोडा येथील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषि कार्यानुभव ( ) कार्यक्रमा अंतर्गत गोगाव येथील बियाणे उगवण प्रात्यक्षिकात शेतकऱ्यांना बियाणे लागवडीच्या महत्त्वाच्या पैलूंबद्दल यशस्वीरित्या प्रशिक्षित करून शिक्षित केले सदर कार्यक्रमात शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे बियाणे, योग्य मातीची तयारी आणि चांगल्या उगवणीसाठी आणि त्यानंतरच्या पीक उत्पादनासाठी पुरेसा ओलावा यांचे



महत्त्व अधोरेखित केले या प्रात्यक्षिकातून शेतकऱ्यांना बियाणे निवड, मातीचे आरोग्य व्यवस्थापन (पीएच आणि पोषक तत्वांच्या पातळीसह) आणि उगवण सुरू करण्यात आर्द्रतेची भूमिका याबद्दल व्यावहारिक ज्ञान शेतकऱ्यांना दिले. कार्यक्रमाच्या परस्परसंवादी स्वरूपामुळे सहभागींमध्ये ज्ञानाची देवाणघेवाण आणि चर्चा झाली, ज्यामुळे सहयोगी शिक्षण वातावरण निर्माण झाले. या कार्यक्रमामुळे स्थानिक शेतकरी समुदायात सुधारित कृषी पद्धती आणि उत्पादकता वाढेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

या अभ्यास दौऱ्यात ओमप्रकाश वाकडे, राहुल चिखलोंढे, आयुष अंबोरे विशाल तोंडफोडे, त्रिकोण रंदये, कृषि सहाय्यक,आणि शेतकरी बांधव यांनी सक्रिय सहभाग घेतला. गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक करत, अशी उपक्रमशील कामे नियमितपणे व्हावीत आणि शेतीविषयक मार्गदर्शन मिळत राहावे अशी या कार्यक्रमा दोऱ्यात अपेक्षा व्यक्त केली.

## बाळ येथील ११ केवी फिडर पोंभुर्णा तालुक्यातील अन्य गावांना जोडल्यास खबरदार

### युवक काँग्रेसचे प्रशांत उराडे यांचा महावितरणला

महासागर तालुका प्रतिनिधी

**पोंभुर्णा, दि. २७ जून :** मागील कित्येक वर्षापासून बेंबाळ ११ केवी फिडर वरून पोंभुर्णा तालुक्यातील देवाडा, जुनगाव, घोसरी तसेच इतर गावांना जोडण्यात आले होते. त्यामुळे बेंबाळ फिडरवर मोठा ताण पडून लाईट वारंवार बंद पडत होती.

त्यामुळे या परिसरातील नागरिकांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत होते आणि याबाबत महावितरणला निवेदनही दिले होते.त्यामुळे पोंभुर्णा सब डिव्हीजन मधून देवाडा,जुनगाव, घोसरी व ईतर गावांना जोडण्यात आले असून त्यामुळे बेंबाळ फिडरवरील ताण कमी झाला आहे.



पुन्हा बेंबाळ ११ केवी फिडरवर पोंभुर्णा तालुक्यातील अन्य कोणत्याही गावांना जोडण्यात येऊ नये व पोंभुर्णा सब डिव्हिजन मधील ब्रेक डाऊन झाल्यावर बेंबाळ फिडरवरून विद्युत पुरवठा करू नये.सध्या विद्यूत पुरवठा सुरळीत असून महावितरणला वरिल मागणीसाठी युवक काँग्रेसचे प्रशांत उराडे यांनी निवेदन दिले. पुन्हा नवीन गावांना बेंबाळ फिडरवर जोडणी केल्यास संपूर्ण बेंबाळ व परिसरातील नागरीकांना घेऊन याविरोधात तीव्र आंदोलन केल्या जाईल असा इशारा त्यांनी दिला.

## शांताबाई काळे यांचे निधन

महासागर प्रतिनिधी

**नेरी, दि. २७ जून :** चिमुर शहरातील स्वातंत्र्य संग्राम सैनिक स्व. दामोधर लक्ष्मण काळे गुरुजी यांच्या पत्नी तथा ॲड. महेशदत्त दामोधर काळे यांच्या आई श्रीमती शांताबाई काळे यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्या ८२ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर २७ जुन रोजी उमा नदी कवडशी (रोडी) मोक्षधाम घाटावर अंतीम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे.



## म्हातारदेवी ग्रामपंचायत मध्ये लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशन तर्फे

# दिव्यांगांना आणि ज्येष्ठांना आरोग्य साहित्याचे वाटप

महासागर प्रतिनिधी

**घुग्घुस, दि. २७ जून :** लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशन आणि लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने म्हातारदेवी ग्रामपंचायत मध्ये दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एका आरोग्य विचार समारंभाचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमात गरजू व्यक्तींना विविध प्रकारच्या आरोग्य सामग्रीचे वाटप करण्यात आले, ज्यामुळे त्यांच्या जीवनातील अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे.

या कार्यक्रमाचे मुख्य उद्दीष्ट दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात आवश्यक असलेल्या साधनांची उपलब्धता करून देणे हे होते. या प्रसंगी व्हीलचेअर,आराम खुर्ची, आधार



काठी, शौचालय चेअर, रुग्णांसाठी बेड,गुडग्याचा पट्टा आणि कमर पट्टा यांसारख्या विविध आरोग्य उपयोगी वस्तूंचे वितरण करण्यात आले. या सामग्रीमुळे या व्यक्तींना अधिक स्वावलंबी होण्यास आणि त्यांचे जीवनमान सुधारण्यास निश्चितच मदत मिळेल.

कार्यक्रमाचे उद्घाटन लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशन सहायक महाप्रबंधक श्रीमती विद्या पाल आणि कार्यक्रमाच्या अध्यक्षा ग्रामपंचायत म्हातारदेवी येथील सरपंच्या सौ.संध्या पाटील यांच्या हस्ते झाले प्रमुख अतिथी म्हणून लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड चे व्यवस्थापक राधेश्याम गांधी, दिपक साळवे,ग्रामपंचायत चे सदस्य टिपले, अस्मिता पाझारे,सौ.देहरकर,मायेची सावली उपक्रमाचे समन्वयक मनोज सोदारी आशावर्कर व ज्येष्ठ नागरिक यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात एकूण ९० दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये व्हीलचेअर,आराम खुर्ची, आधार काठी,शौचालय चेअर, रुग्णांसाठी बेड,कमर पट्टा यांचा समावेश होता. या आरोग्य विचार समारंभाबद्दल बोलताना म्हातारदेवी ग्रामपंचायतीच्या सरपंच संध्या पाटील आपले मनोगत व्यक्त केले. 'लॉयड्स इन्फिनाईट फाउंडेशन यांनी आमच्या गावात येऊन दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी जो स्तुत्य उपक्रम राबवला आहे, तो खरोखरच कौतुकास्पद आहे,'असे सरपंच म्हणाले.पुढे बोलताना त्या म्हणाल्या, 'अशा प्रकारच्या मदतीची आमच्या गावातील अनेक बांधवांना नितांत गरज होती.व्हीलचेअर, आराम खुर्ची आणि इतर आरोग्य उपयोगी साहित्य मिळाल्याने अनेकांचे जीवनमान सुकर होईल. या मदतीमुळे केवळ शारीरिक आधारच मिळत नाही, तर त्या व्यक्तींना समाजात सन्मानाने जगण्याची प्रेरणाही मिळते.' 'ग्रामपंचायतीच्या वतीने मी कंपनीचे मनःपूर्वक आभार मानते. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीमुळे समाजात एक चांगला संदेश जात आहे आणि इतर संस्थांनीही यातून प्रेरणा घ्यावी अशी अपेक्षा आहे.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

